# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया

## कायदेशीर मदत संरक्षण बचाव सल्लागार प्रणाली, गोंदिया

### कंत्राटी तत्त्वावरील शिपाई या पदांकरीता पात्र उमेदवारांसाठी सुचना

१. जिल्हा न्यायालय, गोंदिया यांचे संकेतस्थळावर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया कार्यालयाच्या सुचना फलकावर शिपाई (कंत्राटी) या पदांकरीता पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व सुचना प्रसिध्द करण्यात येत असून त्या व्यतिरिक्त कोणतेही पत्र उमेदवारास पाठविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

२. शिपाई (कंत्राटी) या पदांकरीता पात्र उमेदवारांची सर्वप्रथम एकुण ५० गुणांची लेखी चाचणी ज्यात प्रत्येकी दोन गुणांचे बहुपर्यायी स्वरूपाचे २५ प्रश्न असतील व त्याकरीता उमेदवारांना ३० मिनिटे वेळ देण्यात येईल. सदर लेखी चाचणीत उत्तीर्ण होण्याकरीता ५० टक्के म्हणजे २५ गुणांची आवश्यकता राहील व सदर चाचणीत उत्तीर्ण उमेदवारांना पुढील चाफल्य/स्वच्छता चाचणीस पात्र ठरविण्यात/बोलाविण्यात येईल.

३. शिपाई (कंत्राटी) या पदांकरीता पात्र उमेदवारांची लेखी चाचणी दिनांक २१/०७/२०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजता 'बहुउद्देशीय सभागृह' ५वा मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया येथे आयोजित करण्यात येत असून सदर चाचणीस उमेदवारांना स्वतःचा राईटिंग पॅड वापरण्याची मुभा देण्यात येत आहे. परीक्षेस पात्र उमेदवारांनी परीक्षेच्या अर्धा तास अगोदर उपस्थित राहावे. सदर परीक्षेला येतांनी उमेदवारांनी स्वतःचे कमीत–कमी एक एक मुळ ओळखपत्र (जसे की, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार कार्ड, वाहन चालक परवाना इत्यादी) सोबत आणणे अनिवार्य आहे. सदर ओळखपत्र सोबत न बाळगल्यास/आणल्यास लेखी चाचणीस बसता येणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सदर चाचणीचा निकाल त्याच दिवशी जिल्हा न्यायालय, गोंदिया यांचे संकेतस्थळावर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

४. लेखी चाचणीत उत्तीर्ण होणा–या उमेदवारांची त्याच दिवशी दिनांक २१/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता चाफल्य/स्वच्छता चाचणी एकुण २५ गुणांची जिल्हा व सत्र न्यायालय परीसर, गोंदिया येथे घेण्यात येईल. सदर चाचणीचा निकाल त्याच दिवशी जाहीर करण्यात येईल. सदर चाफल्य/स्वच्छता चाचणीत उत्तीर्ण होण्याकरीता ५० टक्के म्हणजे १२.५ गुणांची आवश्यकता राहील. सदर चाचणीत उत्तीर्ण उमेदवारांना पुढील परीक्षेस म्हणजेच मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

५. केवळ लेखी व चाफल्य चाचणी उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल व त्यांची मुलाखत दिनांक २१/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजता मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गोंदिया यांचे निजी दालन, पहिला मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया येथे होईल व त्यांचा निकाल त्याचदिवशी जिल्हा न्यायालय, गोंदिया यांच्या संकेतस्थळांवर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गोंदिया येथील सुचना फलकावर जाहीर/प्रसिध्द करण्यात येईल.

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा,
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गोंदिया

दिनांक :–१६/०७/२०२६.
ठिकाण :– गोंदिया